राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

द्वितीय अपिल क्र.रामाआ :- ६०८७ / २०२३/ सांगली

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| सिध्देश्वर गणपती जाधव | सहाय्यक नगररचनाकार, विटा नगरपरिषद विटा, ता.खानापूर, जि. सांगली | मुख्याधिकारी, विटा नगरपरिषद विटा, ता.खानापूर, जि. सांगली |

( सुनावणी दिनांक - १८/०६ /२०२५ )

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचेकडे दि.२७.०९.२०२३ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. व्दितीय अपील दाखल करतांना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. त्यानूसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, विद्यमान जन माहिती अधिकारी तसेच विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपीलार्थी यांनी दि.१०.०७.२०२३ च्या माहिती अर्जात कसबे विटा ता.खानापूर जि.सांगली येथील सर्व्हे नंबर ७७० मध्ये दाखल करण्यात विकास आराखडा नकाशाची अंतिम रेखांकन नकाशाची नक्कल, आदेशाची नक्कल आणि त्यासोबत दाखल करण्यात आलेली सर्व संपूर्ण कागदपत्रे सही व शिक्यानिशी माहिती मागितलेली आहे.

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, " जन माहिती अधिकारी यांनी लिखीत माहिती व छायांकित माहितीच्या नक्कला अद्यापर्यंत दिल्या नाहीत."

आज रोजी सुनावणी दरम्यान जनमाहिती अधिकारी यांनी अवगत केले की, "अपिलार्थीला दि.०३.०८.२०२३ च्या पत्राने उपलब्ध माहिती दिली आहे. तसेच उर्वरीत माहिती उपलब्ध आहे ती देणेची कार्यवाही करणेत येईल."

जन माहिती अधिकारी यांनी उर्वरीत माहिती अपिलार्थीला देण्याचे आश्वासन आयोगासमक्ष दिले. सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक नगररचनाकार, विटा नगरपरिषद विटा, ता.खानापूर, जि. सांगली यांनी अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र "अ" मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व यापूर्वी पुरविण्यात आलेली माहिती वगळून उर्वरीत माहिती विहीत तरतूदीनूसार देय होणारी माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसांचे आत अपिलार्थीस विनामुल्य उपलब्ध करून द्यावी.

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, विटा नगरपरिषद विटा, ता.खानापूर, जि. सांगली यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

उपरोक्त निर्देशांसह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जावक क्र. ६०८७ / २०२३ / सांगली 9148/2025 दिनांक - 2/9/2025